# शालिमार पेंट्सच्या महसुलात तिसऱ्या तिमाहीत वाढ

**पुणे । प्रतिनिधी**

शालिमार पेंट्स ह्या प्रतिष्ठित पेंट निर्मात्यांनी नुकतेच २०१८-१९ ह्या वर्षातील तिसऱ्या तिमाहीचे निकाल जाहीर केले. ह्या तिमाहीत कंपनीने स्थिर वाढ साध्य केली आणि एकत्रित उत्पन्नात दुसऱ्या तिमाहीतील ७२.१ कोटी रुपयांवरून तिसऱ्या तिमाहीत ७५.४ कोटींपर्यंत वाढ झाली. २०१७-१८ मधील संबंधित कालावधीतील ६६.७ कोटी रु.च्या तुलनेत कंपनीने १३% ची लक्षणीय वाढ नोंदवली आहे.

अहवालानुसार, २०० कोटींच्या आसपास, 'राईट्स इशू' नुकताच बंद करण्यात आला. कंपनीने घोषित केलं की मैलाचा दगड ठरणारा नाशिकचा प्रकल्प, २०१९-२० च्या पहिल्या तिमाहीमध्ये परत लाँच केला जाणार आहे. त्यामुळे, शालिमार पेंट्सने अतिरिक्त क्षमता आणि पश्चिम भारतातील अधिकच्या मागणीसाठी तयारी केली आहे.

शालिमार पेंट्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, सुरेंदर भाटिया म्हणाले, गेल्या दोन तिमाहीत अशी वाढ सध्या केल्याबद्दल आम्हाला आनंद होत आहे. गेल्या तिमाहीत असलेल्या सणासुदीच्या दिवसांचा ह्यामध्ये मोठा वाटा आहे. सुशोभीकरणाच्या प्रकारांमध्ये आमच्या उत्पन्नात वाढ झाली. ते पुढे म्हणाले, सरकारने २०१९-२० च्या अर्थसंकल्पात रिअल इस्टेट क्षेत्रासाठी, घर खरेदीदार आणि विकासक ह्यांसंबंधित काही सुधारणा घोषित केल्या आहेत. कॅपिटल गेनचा एकाऐवजी दोन घरांमध्ये वापर करण्याची परवानगी दिल्याने खरेदीदारांवर त्याचा सकारात्मक परिणाम होऊन अधिक मालमत्ता खरेदी करण्यास वाव मिळेल. त्यामुळे रिअल इस्टेटसंबंधित व्यवसाय वाढवण्याची संधी मिळेल आणि त्याचा पेंट उद्योगालाही लक्षणीय फायदा होईल.